<u>स्मरण पत्र -१</u>

<u>तात्काळ</u>

दुरध्वनी क्र. ०२२- २२७९४१४५

ई-मेलdoesttclass२.wrd@maharashtra.gov.in

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

क्र. प्रतिनि २०२१/प्र.क्र.४८/२१/आ (वर्ग-२)

जलसंपदा विभाग,

३ रा मजला, मुख्य इमारत,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक :- १० मार्च, २०२१.

प्रति,

जलसंपदा विभागातील सर्व महासंचालक

सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे, जलसंपदा विभाग

आयुक्त, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद

जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता

अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे

अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक

अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे / पुणे / औरंगाबाद / नागपूर / अमरावती

अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे.

**विषय :** उप विभागीय अभियंता, कृष्णा गोदावरी विश्रामगृह, नवी दिल्ली येथील पद भरण्याबाबत.

राज्य शासन व केंद्र शासन यांच्यातील समन्वयासाठी नवी दिल्ली येथील उप विभागीय अभियंता, कृष्णा गोदावरी विश्रामगृह नवी दिल्ली येथील उप अभियंता संवर्गातील १ पद मंजूर आहे. सदर पद रिक्त असल्यामुळे राज्य शासन व केंद्र शासन यांच्यातील समन्वयासाठी अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे सदर रिक्त पद तात्काळ भरण्याबाबत मा. मंत्री (जलसंपदा) यांच्या दिनांक २९ जानेवारी, २०२१ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या आढावा बैठकित सुचित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने समक्रमांकाच्या दि. २३/०२/२०२१ च्या पत्रान्वये इच्छुक अभियंत्याचे प्रस्ताव १ मार्च, २०२१ पर्यंत मागविण्यात आले होते. परंतु आपल्या कार्यालयाकडून याबाबत कोणतेही प्रस्ताव अथवा माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

सदर प्रकरणी वरिष्ठाकडून सतत पाठपुरावा चालू आहे. तरी नवी दिल्ली येथील उप अभियंता संवर्गातील रिक्त पदासाठी आपल्या अधिनस्त कार्यालयातील इच्छुक अभियंत्याचे प्रस्ताव आपल्या शिफारशीसह दोन दिवसात शासनास सादर करावेत, ही विंनती.

(रणजित अहिरे)

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग पुणे/ औरंगाबाद / नागपूर यांनी फक्त जलसंपदा विभागाचा विकल्प दिलेल्या व सध्या मृद व जलसंधारण विभागात कार्यरत असलेल्या उप अभियंत्याची इच्छुकता दयावी.

२. आ (वर्ग-२) कार्यासन, संग्रहार्थ.